शिक्षणमित्र : सौ. सुप्रिया अमोल ठिकणे.

शाळेचे नाव :न्यु इंग्लिश स्कूल, अ.लाट

जीवन गणित उपक्रम :विद्यार्थ्याला गणितीय कौशल्यातील विकास करण्यासाठी जानेवारी महिन्यातील पुढील उपक्रम राबविण्यात आले.

१.नफा तोटा २.क्षेत्रफळ ३.3d भौमितिक आकार ४.घटक चाचणी सराव ५.गणित समिती कार्यवाही आढावा

जीवन विज्ञान उपक्रम :विज्ञान विषयातील ज्ञानात भर घालण्यासाठी पुढील उपक्रम राबविण्यात आले.

१.हवेचे अस्तित्व गटचर्चा २.हवेचा दाब प्रयोग ३.सुरेश अग्रवाल यांचे व्हिडीओ मार्गदर्शन ४.विज्ञान खेळणी ५.विज्ञान समिती कार्यवाही आढावा

जीवन कौशल्य उपक्रम :विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यासाठी जीवन कौशल्यामध्ये पुढील उपक्रमांचा समावेश करण्यात आला.

१.बालिका दिन –भेटकार्ड बनवणे २.साहित्य लेखन मार्गदर्शन ३.लेखक तुमच्या भेटीला ४.हस्तलिखित मार्गदर्शन ५.आरसा वही ६.सांगली व कोल्हापूर जिल्हयातील विविध भागामध्ये पथनाट्य सादरीकरण

विद्यार्थी विशेष बाब : पथनाट्य सादरीकरणामुळे सांगली व कोल्हापूरमध्ये विद्यार्थ्यांचे कौतुक.

अमूल्या गिरमल हिने सुंदर व वैचारिक कविता लेखन केले.

शिक्षक विशेष बाब :

१.लेखक तुमच्या भेटीला या कार्यक्रमात ‘भ्रष्टाचार’ या विषयावर कविता लेखनात प्रथम क्रमांक

२.सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील पूरबाधित भागांमध्ये पथनाट्य सादरीकरणाची तयारी व पथनाट्य लेखन

३.’स्नेह्बंद’ या बचतगटामध्ये हळदी-कुंकू कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवर म्हणून महिलांना मार्गदर्शन केले

सुविचार : अनुभव हाच श्रेष्ठ गुरु आहे .

----------------------------------------------------------------------------------------------------

शिक्षणमित्राचे नाव : मयुरी प्रल्हाद बरगे

शाळेचे नाव : केंद्रीय प्राथमिक शाळा व कन्या विद्या मंदिर, अ.लाट

विद्या मंदिर लाटवाडी .

जीवन गणितातील उपक्रम : जानेवारी महिन्यात जीवन गणित विषयांतर्गत दैनंदिन जीवनातील बँकेचे महत्व पटवून देण्यासाठी बँक व सरळव्याज,पाढे पाठांतर,काडेपेटी व सायकलची व्हालट्यूबपासून द्विमितीय,त्रिमितीय आकार बनवणे तसेच कसोट्या लक्षात ठेवण्यास मार्गदर्शन करण्यात आले.

जीवन विज्ञानातील उपक्रम :जानेवारी महिन्यात जीवन विज्ञान या विषयांतर्गत 'विज्ञान :शाप की वरदान' या विषयावर वाद-विवाद सत्र घेण्यात आले.दैनंदिन जीवनात वापरली जाणारी साधी यंत्रे व त्यामागील शास्त्र व हर्बेरीअम ही संकल्पना समजावून देता आली.

जीवन कौशल्यातील उपक्रम :जानेवारी महिन्यातील जीवनकौशल्य विषयांतर्गत कागदी हेलिकॉप्टर बनवणे,युट्युब चॅनलवर बोधात्मक गोष्टी दाखवणे, हस्तलिखित तयार करण्यासाठी मार्गदर्शन करणे, प्रजासत्ताक दिनानिमित्त तिरंगी बॅच तयार करून घेणे व ब्राझील गाण्याच्या तालावर एरोबिक्स हा व्यायाम प्रकार शिकवणे यावर भर देण्यात आला.

बालिका दिन : ३ जानेवारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी बालिका दिन साजरा करण्यात आला. डॉ. अस्मिता बडबडे यांच्या दवाखान्याला भेट देऊन मुलींना वयात येताना घ्यावयाची काळजी व अडचणी यावर माहिती देण्यात आली. शिवाय प्रभातफेरी काढण्यात आली.

विद्यार्थी विशेष प्राविण्य : प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात मुलांनी ब्राझील गाण्यावर लयबद्धपणे कवायत करून दाखवले.

शिक्षक विशेष प्राविण्य : लाटवाडी विद्या मंदिरमध्ये ब्राझील गाण्यावर एरोबिक्स घेतल्यामुळे माझा व प्रकल्प समन्वयक स्मिता मोटे मॅडम यांचा सत्कार करण्यात आला.

सुविचार : 'आयुष्यात कोणतीही गोष्ट मला शक्य नाही म्हणू नका,वेळ घ्या,विचार करा,परिश्रम करा म्हणजे अशक्य गोष्टी शक्य होतील'.

----------------------------------------------------------------------------------------------------

शिक्षण मित्राचे नाव – सौ.तेजस्वी स्वप्निल रेडेकर

शाळा- कन्या व कुमार विद्या मंदिर शिरद्वाड

विद्यार्थी उपस्थिती -८७%

जीवन गणित –१)सम व्यस्त प्रमाण,बँक  सरळ व्याज ,भौमितिक आकार ,वर्तुळ,व्याज,शाब्दिक गणित-दर,मुदत, सरळ व्याज काढणे,3d मध्ये भौमितिक आकार बनविले.

जीवन विज्ञान –भूकावचातील साधन संपत्ती ,धातू,अधातू मुलांना सूक्ष्मजीव

स्वरूप समजावून सांगितले.उपयुक्त व उपद्रवी सूक्ष्मजीव, खनिजे ,त्यांचा उपयोग. स्नायू व स्नायूंचे प्रकार व पचन संस्था यांची माहिती घेणे. पेशीमय रचना व विविध आकृत्या काढून मुलांना समजावून सांगितले.

जीवन कौशल्य –जीवन कौशल्यात अनेक वस्तू बनवायला शिकवले उशी बनविणे,विणकाम,विविध टाके विणायला शिकविले.फोटोफ्रेम बनविले.ग्रीटिंग स्पर्धा घेतली.कथा व कविता बनवून घेतल्या.हस्लीखीतासाठी मार्गदर्शन केले.आरसा वही मार्गदर्शन केले.

विशेष कार्यक्रम- माता पालकांसाठी हळदी कुंकू कार्यक्रम केला. तिळगुळ वाटप केले,माता पालकांच्या स्पर्धा घेतल्या.बेस्ट आई स्पर्धा घेतली.त्या स्पर्धे मध्ये धनश्री कांबळे,श्रुती पाटील,सौंदर्या पाटील,प्रतीक्षा आरगे यांच्या आईचा प्रथम,द्वितीय,तृतीय

व उत्तेजनार्थ नंबर मिळविला.

विद्यार्थी विशेष प्राविण्य-विद्यार्थ्यांनी स्वरचित कथा,कविता लिहल्या,त्यामध्ये श्रुती पाटील,सानिका शिंत्रे, रितेश कोरे यांनी सुंदर कविता लिहल्या.

शिक्षक विशेष प्राविण्य –शिक्षक व विद्यार्थ्याना कथा व कविता या विषयावर मार्गदर्शन केले.शिक्षकांच्या काव्य लेखन स्पर्धेमध्ये दिवितीय क्रमांक मिळविला.

विषय समित्यांचा आढावा -

गणित समिती-गणित विषयांची बैजिक सूत्रे यांचा अभ्यास या समितीत करून घेतला.

विज्ञान समिती –विज्ञान विषयक, शास्त्रज्ञ व त्यांचे शोध, आजीबाई चा बटवा हे उपक्रम पूर्ण करून घेतले.

भाषा समिती – या महिन्यात साहित्य विषयक कार्यशाळा घेण्यात आल्यामुळे अनेक मुलामुलींना सुंदर सुंदर कविता लिहल्या.चारोळ्या ,कथा,विनोद लिहले.पथनाट्या लिहून काढले.

उद्योग समिती –उशी बनवून काही विद्यार्थ्यांनी विक्री केली.विक्री योग्य वस्तू कशा बनवाव्यात व फायदा कसा मिळवावा या विषयी मार्गदर्शन केले.

इंग्रजी समिती –इंग्रजी शब्दांच्या भेंडया व अ या अक्षरांच्या जास्तीत जास्त शब्द घेतले.

---

शिक्षण मित्राचे नाव –सौ. तृप्ती संतोष उमराणी

शाळेचे नाव-विद्या मंदिर शिवनाकवाडी

उपस्थिती -९०%

जीवन गणित-विद्यार्थ्यांना गणितीय कौशल्य अवगत व्हावे या हेतूने पुढील उपक्रम घेतले.

शब्दिक व व्यावहारिक गणित, नफा-तोटा, वर्तुळकंस , क्षेत्रफळ व परिमिती ,शेकडा नफा, शेकडा तोटा,त्रिकोणाचे गुणधर्म व प्रकार,चौकोन व चौकोणाचे प्रकार,

जीवन विज्ञान – मानवी स्नायू व पचनसंस्था ,स्नायूचे प्रकार ,भौतिक व रासायनिक बदल ,बल व बलाचे प्रकार

जीवन कौशल्य –फेस्टिवल मध्ये डान्स बसविले व सराव घेतले.हस्तलिखित मार्गदर्शन केले.कथा व कविता तयार करून घेतल्या.अक्षर लेखन व संगणक हाताळणे या विषयी मार्गदर्शन केले.पायपुसणी तयार करून घेतले.

विद्यार्थी विशेष प्राविण्य-जानेवारी महिण्यात १२ जानेवारी २०२० रोजी लेखक आपल्या भेटीला या कार्याक्रमात विद्यार्थ्यांनी कथा व कविता सादर केल्या.त्याच प्रमाणे शिवानाकवाडी यात्रे मध्ये विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शन कार्याक्रमात सहभागी झाले.

शिक्षक विशेष प्राविण्य –लेखक आपल्या भेटीला या कार्यक्रमाचे सौ.तृप्ती संतोष उमराणी यांनी सूत्रसंचालन केले.

सुविचार-आयुष्यात कष्टाला पर्याय नाही.

-----------------------------------------------------------------------------------------------शिक्षण मित्राचे नाव : सौ.शितल महेश काळे

शाळेचे नाव : हेरवाड हायस्कूल, हेरवाड.

जीवन गणितातील उपक्रम -१.समप्रमाण-व्यस्तप्रमाण २.भौमितिक रचना –परीघ त्रिज्या व व्यास ३.बँक-बँकेचे उपयोग ४. 3d –भौमितिक आकृती

जीवन विज्ञानातील उपक्रम: १.हेलिकॉप्टर बनवणे. २.ध्वनी आणि ध्वनीचे प्रकार ३.बाल आणि बलाचे प्रकार ४. विविध गोष्टींमधील विज्ञान समजून घेतले.

जीवन कौशल्यातील उपक्रम : १. भेटकार्ड बनवणे २.वाचलेल्या पुस्तकासंबंधी चर्चा घडवून आणणे. ३.लेखक आमच्या भेटीला या कार्यक्रमाचा अभिप्राय ४.कथा-कविता याबद्दल मार्गदर्शन केले ५.हस्तलिखीताचे मार्गदर्शन केले.

शिक्षणमित्र जीवन कौशल्य उपक्रम : १.लेखक आमच्या भेटीला या कार्यक्रमाद्वारे कविता कशी करावी याचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. २.भ्रष्टाचार या विषयावर १४ ओळींची कविता लिहिली .

सुविचार : ग्रंथ हेच गुरु.

----------------------------------------------------------------------------------------------